बीड । गुरूवार
२४.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : २४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




## पहलगाम हल्ल्यानंतर सरकार ॲक्शन मोडवर; १५०० लोकांना घेतलं ताब्यात, चौकशी सुरू

**वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यात आतापर्यंत २८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकजण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन परदेशी नागरिकांचा देखील समावेश आहे. या दहशतवादी हल्ल्यानंतर आता जम्मू- काश्मीरमध्ये सुरक्षा एजन्सीकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार जम्मू काश्मीरमधून १५०० पेक्षा अधिक लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं असून, त्यांची चौकशी सुरू आहे. या लोकांना काश्मीरच्या संवेदनशील भागांमधून ताब्यात घेण्यात आलं आहे. यामध्ये वेगवेगळ्या जिल्ह्यांमधल्या लोकांचा समावेश आहे.



दहशतवादी प्रकरणाशी संबंधित प्रकरणात यापूर्वी ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली होती, अशा लोकांचा यामध्ये समावेश आहे. या दहशतवाद्यांना ज्यांनी आश्रय दिला होता, त्यांचा शोध देखील सुरू आहे. या दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये सर्च ऑपरेशन सुरू आहे. संशयित लोकांची चौकशी सुरू आहे. जम्मू काश्मीरमध्ये सैनिकांकडून छापेमारी सुरू आहे, या हल्ल्यामागे असलेल्या दहशतवाद्यांच्या स्लीपर सेल्सचा शोध सुरू करण्यात आला आहे. या दहशतवाद्यांना कोणी अश्रय दिला होता, त्यांना शस्त्र कोणी पुरवली याचा शोध आता घेण्यात येत आहे. सुरक्षा बंदोबस्तात मोठी वाढ करण्यात आली आहे.

### ▸ वीस लाखांच्या बक्षीसाची घोषणा

दरम्यान जम्मू -काश्मीर पोलिसांकडून मोठी घोषणा करण्यात आली आहे, हल्लेखोरांची माहिती देणाऱ्याला वीस लाखांच्या बक्षीसाची घोषणा करण्यात आली आहे. पोलिसांकडून या हल्लोखांचा शोध घेण्यात येत आहे. दरम्यान या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याकडून पाकिस्तानला थेट इशारा देण्यात आला आहे. असल्या भ्याड हल्ल्याला भारत घाबरत नाही. दहशतवाद्यांना असं उत्तर दिलं जाईल की संपूर्ण जग बघत राहील, जे पडद्यामागचे सूत्रधार आहेत, त्यांना देखील शिक्षा होणार असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

### ▸ जम्मू-काश्मीरमध्ये बंदची हाक

दरम्यान या घटनेचा निषेध करण्यासाठी आज संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. अनेक ठिकाणी संचारबंदी सदृश्य परिस्थिती होती. सुरक्ष यंत्रणांनी या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमधील काही जणांना तब्यात घेतलं आहे.

## पाकधार्जिण्या अतिरेक्यांविरोधात बीड जिल्हा शिवसेना आक्रमक!

### पहलगाम पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा शिवसेनेकडून जाहीर निषेध

**बीड । प्रतिनिधी**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबार भ्याड हल्ल्यामुळे असंख्य निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला तसेच या घटनेमुळे देशभरात मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली बीड




जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. दरम्यान संतप्त शिवसैनिकांनी अतिरेक्यांच्या फोटोला जोडे मारत मुडदाबाद मुडदाबाद

▶▶ उर्वरित पान २ वर

## जालन्याचं दाम्पत्य, ठाण्यातले ३७ जण, पहलगाममध्ये अडकलेल्यांची सध्याची स्थिती काय?

**वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला आहे. या हल्ल्यात एकूण २६ पर्यटकांचा दुदैवी मृत्यू झाला आहे. दहतवाद्यांनी नावं विचारून पर्यटकांना गोळ्या घातल्या आहेत. या हल्ल्यात अनेकजण जखमी झाले असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हल्ल्यामध्ये महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. असे असतानाच आता जम्मू-काश्मीरला फिरायला गेलेल्या महाराष्ट्रातील इतर पर्यटकांची काय स्थिती आहे, असे विचारले जात आहे. सर्व पर्यटकांना सुखरुप आणण्यासाठी सरकारने आपले प्रयत्न चालू केले आहेत. सरकारने हेल्पलाईन नंबरही जारी केले आहेत.

जालना जिल्ह्यातील



साबळे कुटुंब सुरक्षित- मिळालेल्या माहितीनुसार जालना जिल्ह्यातल्या भोकरदन तालुक्यातील राजूर गणपती येथील मनोज साबळे, पत्नी आणि छोटा मुलगा हे ३ जण सध्या जम्मू काश्मीर अडकले आहेत. ते सुखरूप असल्याची माहिती आहे. काल ज्या ठिकाणी दहशतवादी हल्ला झाला होता, त्या ठिकाणावरून अगदी काही अंतरावरच हे दाम्पत्य होतं. त्यामुळे या घटनेचा सर्व प्रसंग त्यांनी काल आपल्या आई-वडिलांना सांगितला. जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या हल्ल्यामुळे त्यांचं कुटुंब सध्या चिंताग्रस्त अवस्थेत आहे. या घटनेचा प्रसंग सांगत असताना साबळे यांच्या परिवाराला अश्रू अनावर झाले. साबळे दाम्पत्य सध्या सुखरूप असल्याची माहिती मिळाली आहे.

ठाण्यातील ३७ पर्यटक सुरक्षित

दुसरीकडे ठाणे जिल्ह्यातील काही पर्यटक जम्मू-काश्मीरमध्ये अडकले आहेत. जिल्ह्यतील ४० पर्यटक पहलगाम येथे होते. या हल्ल्यात डोंबिवली शहरातील नवापाडा, पांडुरंग वाडी आणि नांदिवली परिसरात राहणाऱ्या हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. इतर ३७ पर्यटक सुरक्षित आहेत. मृतांच्या नातेवाईकांना सर्व प्रकारची मदत केली जात आहे. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जम्मू-

▶▶ उर्वरित पान २ वर

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हा कार्याध्यक्ष पदी दत्तात्रय नरनाळे

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे कार्य हे देशभर चालू असून पत्रकारांच्या प्रश्नावर आवाज उठवणारी आणि न्याय हक्कासाठी लढणारी एकमेव संघटना असून या संघटनेच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे यांची संस्थापक अध्यक्ष मनोहरजी सुने साहेब प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख मराठवाडा अध्यक्ष जगदीश बुलबुले,

▶▶ उर्वरित पान २ वर






*श्रीनगर: बीडची लेक श्रीनगरमध्येही लढवय्या! अडकलेल्या पर्यटकांना मदतीचा हात, पाकिस्तानविरोधात गर्जना! बीडची लेक पुजा मोरे श्रीनगरमध्ये अडकली, पण तिथेही दाखवली हिंमत! पाकिस्तानी षडयंत्राविरोधात रस्त्यावर उतरून केली घोषणाबाजी, पतीची साथ घेत इतर पर्यटकांनाही दिला मदतीचा हात!*

## तुम्ही घाबरू नका, मी सगळी व्यवस्था करतो; रूपाली ठोंबरेंना अजितदादांचा फोन



**पुणे प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशवादी हल्ल्यानंतर देशभरात मोठी खळबळ उडाली असून, या घटनेत महाराष्ट्रातील ६ पर्यटकांसह एकूण २६ जणांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात जखमी झालेल्या पर्यटकांवर अनंतनाग येथील रूग्णालयात उपचार केले जात आहेत. तर, दुसरीकडे पहलगाम येथे अडकलेल्या पर्यटकांना सुखरूप परत आणण्यासाठी युद्धपातळीवर हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. अशातच राष्ट्रवादीच्या नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यादेखील पहलगाममध्ये असून,

▶▶ उर्वरित पान २ वर

## मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन शेगाव मध्ये : एस.एम.देशमुख

**मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शेगावात झाली पहिली आढावा बैठक**

**शेगाव । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगाव येथे होणार असल्याची माहिती मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सरांनी दिली. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेगाव नगरीमध्ये पहिली आढावा बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडण्याचा विश्वास उपस्थित



पदाधिकाऱ्यांनी दिला.

येत्या ऑगस्ट महिन्यामध्ये मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन हे बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव नगरीमध्ये घेण्याचा निर्णय नांदेड येथील बैठकीत झाला होता. त्यानंतर संतनगरी शेगाव मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिली बैठक पार पडली. यावेळी परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे,डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश प्रतिनिधी युवराज वाघ, प्रदेश उपाध्यक्ष अनिल उंबरकर, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत, राजेश डीखोळकर, गणेश चौकशे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत आगामी राष्ट्रीय अधिवेशना संदर्भात मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख

सर यांनी माहिती दिली. अधिवेशन यशस्वीरित्या यशस्वी करण्याचे आव्हान यावेळी श्री.एस.एम.देशमुख सरांनी केले. या आव्हानाला प्रतिसाद देत


▶▶ उर्वरित पान २ वर



# सांगली जिल्ह्याची जलक्रांतीतून समृध्दीकडे वाटचाल

केंद्र व राज्य शासनाकडून विविध उपसा सिंचन योजना, जलयुक्त शिवार अभियान, शेततळी आदि विविध कामांसाठी भरघोस निधी मिळाल्याने सांगली जिल्हा दुष्काळमुक्तीकडे वाटचाल करीत आहे. शेतीसाठी पाणी मिळू लागल्याने दरडोई उत्पादनात वाढ होऊन जिल्ह्याची वाटचाल समृध्दीकडे होत आहे. या पार्श्वभूमिवर जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचे औचित्य साधून जिल्ह्यातील उपसा सिंचन प्रकल्पांची माहिती देणारा लेख





जिल्ह्यात टेंभू, ताकारी, म्हैसाळ, आरफळ कालवा, कृष्णा कालवा मध्यम प्रकल्प आदिंच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेती सिंचनाखाली आणून जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. हे सिंचन प्रकल्प शेतकऱ्यांना जीवनदायिनी ठरत असून या माध्यमातून दरडोई उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठीही मदत होत आहे.

टेंभू उपसा सिंचन प्रकल्प– टेंभू गावाजवळील बराज वरून मूळ टेंभू उपसा सिंचन योजनेतून विविध टप्प्यांव्दारे २२ अ.घ.फू. पाणी उचलून सातारा, सोलापूर व सांगली या जिल्ह्यातील ७ तालुक्यामधील एकूण ८० हजार ४७२ हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ देणे प्रस्तावित होते. जून २०२४ अखेर ८० हजार ४७२ हेक्टर इतकी सिंचन निर्मिती ( १०० टक्के) झालेली आहे.

टेंभू विस्तारीत उपसा सिंचन प्रकल्पाकरिता ४१ हजार ३ हेक्टर सिंचन क्षेत्र व ८.०० अ.घ.फु. वाढीव पाणी वापर नियोजित गृहीत धरून एकूण १ लाख २१ हजार ४७५ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ देणे प्रस्तावित होते. त्यानुसार टेंभू उपसा सिंचन विस्तारीत प्रकल्पास ७३७०.०३ कोटी इतक्या रक्कमेच्या तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालास शासनाने दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प– कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत ताकारी व म्हैसाळ अशा दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना आहेत. ताकारी उपसा सिंचन योजनेचा उद्गव कृष्णा नदीवर ताकारी गावाजवळ असून या योजनेव्दारे एकूण ४ टप्प्यामध्ये ९.३४ अ.घ.फू. पाणी उचलून त्याव्दारे सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगाव, मिरज, पलूस, कडेगाव व वाळवा या तालुक्यातील २७ हजार ४३० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित आहे. मूळ म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचा उद्गव कृष्णा नदीवर म्हैसाळ गावाजवळ असून या योजनेव्दारे एकूण ६ टप्प्यांमध्ये १७.४४ अ.घ.फू. पाणी उचलून त्याव्दारे सांगली जिल्ह्यातील मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा या तालुक्यातील ८१ हजार ६९७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

म्हैसाळ टप्प क्र. ३ (बेडग) मधून नवीन स्वतंत्र म्हैसाळ विस्तारीत – जत उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. म्हैसाळ विस्तारीत – जत उपसा सिंचन प्रकल्पाकरिता २६ हजार ५०० हेक्टर सिंचन क्षेत्र व ६.०० अ.घ.फू. वाढीव पाणी वापर नियोजित गृहीत धरून एकूण १ लाख ३५ हजार ६२७ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ देणे प्रस्तावित आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना प्रकल्पास १ लाख ३५ हजार ६२७ हेक्टर सिंचन क्षेत्र व ३२.७८ अ.घ.फू. पाणी वापर गृहीत धरून ८२७२.३६ कोटी इतक्या रक्कमेस शासन निर्णय दि. २९ डिसेंबर २०२२ अन्वये पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

आरफळ कालवा– कण्हेर धरणापासून निघणारा डावा कालवा कृष्णा नदीस जेथे छेदतो तेथून पुढे त्या कालव्यास आरफळ कालवा असे संबोधतात. आरफळ कालवा (सांगली जिल्ह्याकरिता) कण्हेर व तारळी या प्रकल्पातून ३.८३ टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे.

कृष्णा कालवा मध्यम प्रकल्प– सातारा जिल्ह्यात कृष्णा नदीवर खोडशी ता. कराड येथे १५२ वर्षांचा ब्रिटिश कालीन वळवणीचा बंधारा असून नदीच्या डाव्या तीरावरून खोडशी बंधाऱ्यापासून ८६.०० कि.मी. लांबीच्या कृष्णा कालव्याव्दारे सातारा जिल्ह्यातील कराड तालुका व सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस व तासगांव या तालुक्यातील एकूण ५० गावे येतात. येरळा नदीवर वसगडे बंधाऱ्यात पाणी सोडण्यात येते.

प्रकल्प ० ते ५६ कि.मी. पर्यंत १८६८ साली पूर्ण करण्यात आला असून महाराष्ट्र शासन निर्णय दि. २५ जून १९५६ अन्वये कृष्णा कालव्याच्या विस्तारीकरण व सुधारणा कामास मंजुरी मिळाली त्यानुसार कृष्णा कालव्याचे विस्तारीकरण व सुधारकाम सन १९७६ साली पूर्ण करण्यात आले. यानंतर वसगडे येथील येरळा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचा बंधारा कृष्णा कालव्याचा टेल टँक म्हणून उपयोगात आणण्यासाठी कृष्णा कालवा विस्तारीकरण व त्यावरील वसगडे बंधारा (जिल्हा सांगली) च्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि. १९ ऑगस्ट १९८८ अन्वये एकूण २४५.९६७ लक्ष रूपये किंमतीस मान्यता देण्यात आली.

(संकलन – श्री. शंकरराव पवार, जिल्हा माहिती कार्यालय, सांगली)

पान ४ वरून पुढे...

## तहसीलदार तसेच...

किट असणे आवश्यक आहे. यावर्षी पावसाळयापूर्वी सर्व पुरप्रवण गावांना आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व साहित्य उपलब्ध रहावे यासाठी शोध व बचाव साहित्य पंचायत समिती स्तरावर रवाना केले आहे. किटमध्ये काय असेल? आपत्ती किटमध्ये प्रथोमचार पेटी, लाईफ बॉय, लाईफ जॅकेट, एलइडी टॉर्च, चैन सॉ, रिपेलिंग रोप, स्ट्रेचर, सेफटी बुट, वॉकी टॉकी, रेनकोट यांचा समावेश आहे. या सर्व वस्तु आयएसआय मार्क असलेल्या दर्जेदार आहेत.

## तहानलेल्या वन्यजीवांसाठी...

लोकसहभाग प्रतिसाद मिळत असून या उपक्रमाद्वावरे कडा व परिसरातील डोंगर टेकड्या वर सिमेंट कॉंक्रीटचे कुत्रीम पानवठे बनवले आहे. त्यात पाच दिवसाला टँकरने विकत पाणी घेऊन टाकले जाते पाऊस पडे पर्यंत पाणी टाकण्याचे काम चालू असते.वन्य प्राण्यांसाठी पाण्याची सोय करायचे असेल तर जीवदया फाउंडेशन टिमशी संपर्क साधावा असे आवाहन प्राणीमित्र नितीन आळकुटे यांनी केले आहे.

पान ४ वरून पुढे...

## जायकवाडीच्या पाण्यासाठी...

आला. यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, अजय साळुंके पाटील, बप्पासाहेब अण्णा तळेकर, ॲड. संजय काळे, राजाभाऊ महाराज कुटे, सरपंच नवनाथ गवते, उपसरपंच परमेश्वर कोळेकर, सरपंच नंदकुमार शिंदे, विजयकुमार करपे, माजी सरपंच गणेश कोळेकर, रमेश जिजा तळेकर, अप्पासाहेब महानोर, राहुल लोंढे, समन्वयक दिनेश गुळवे, बाळासाहेब कोळेकर, देविदास चव्हाण, चंद्रहंस महाराज जाधव, गणेश हाडुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या दुष्काळी भागात शेतीला पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचे गेल्या वर्षभरातील काम व पुढील आंदोलन यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी राजेंद्र गवते, दत्तात्रय सिरसट, दिलीप अलगुडे, शामराव घुगे, वसंत पवळ, रावसाहेब बोर्डे, दीपक कुलकर्णी, आकाश हाकाळे, संतोष नेमाने, अजिनाथ शिंदे, बप्पासाहेब रत्नपारखे, सोमनाथ मोरे, अजय पाटील, ज्ञानेश्वर तांबारे, संतोष गोरे, गणेश लवारे, रमेश जगदाळे आदी उपस्थित होते. यावेळी संजय काळे म्हणाले, की शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शेतीला पाणी गरजेचे आहे व या पाण्यासाठी आपण संघर्ष

पान ४ वरून पुढे...

करणे गरजेचे आहे. सरपंच नवनाथ गवते म्हणाले, की शेतकरी मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी पाणी संघर्ष मोर्चा करणे गरजेचे आहे. अप्पासाहेब महानोर यांनी गरज असलेल्या शेतीला व दुष्काळी भागाला पाणी मिळवून देण्यासाठीचा निर्धार व्यक्त केला. अप्पासाहेब वाणी यांनी मोठ्या संघर्षाशिवाय पाणी मिळणार नाही म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलनात मोठ्या संख्येने उतरावे अशी हाक दिली. शेतीला पाणी मिळावे व शासनाने तात्काळ योजना सुरू करव्यात यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर टाळ–मृदंग मोर्चा काढण्याचा निर्धार यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला. दुष्काळी भागात जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्प व मराठवाडा वॉटर ग्रीड योजना गतीने सुरू करावी यासाठी टोकाचा संघर्ष करणार, असा इशारा यावेळी अजय साळुंके पाटील यांनी दिला.या आंदोलनात शेतकरीव शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन गणेश कोळेकर यांनी केले.

## ॲड.बालाप्रसाद सारडा...

आहे तसेच त्यांची केंद्र सरकारमार्फत जाहिर केलेल्या नोटरीच्या यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट केलेले आहे तसेच जालना मर्चंट को ऑप बँक शाखा बीड येथे पॅनल ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती झालेली आहे.

पान ४ वरून पुढे...

ग्राहक आयोगामधून बँकींग, फायनान्स, आरोग्यविमा, पीकविमा, या संदर्भातील ग्राहकांना न्याय मिळवून दिलेला आहे त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## राजमाता जिजाऊ...

आपण आपल्या आवडीच्या क्षेत्रात नोकरी मिळवू शकतो असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विद्यार्थ्यांना या व्याख्यानाच्या माध्यमातून लिंकिड संदर्भातील प्रक्रिया व्यवस्थित समजली. नोकरीच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी चालून येतात. आपण आपला सीव्ही व्यवस्थितरित्या तयार करून वेबसाईटवर अपलोड करावा असे आवाहन केले. याप्रसंगी ऑनलाइन व्याख्यानासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, प्रा.अशोक उघडे, प्रा.आदित्य सोळंके तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी तर आभार डॉ. ईश्वर छानवाल यांनी व्यक्त केले.

पान १ वरून पुढे...

## पाकधार्जिण्या अतिरेक्यांविरोधात...

पाकिस्तान मुडदाबाद अशा घोषणा दिल्या. भारत देश यशाची उंची गाठत असताना वारंवार पाकधार्जिन अतिरेकी दहशत पसरवण्यासाठी असे भ्याड हल्ले करतात. देशातील निष्पाप लोकांचे बळी घेतात. मात्र देशाची सुरक्षा यंत्रणा त्यांना शोधण्यासाठी कामाला लागलेली आहे. एक शिवसैनिक म्हणून माझी इच्छा आहे जिथे पाकधर्जिन अतिरेकी दिसतील तिथेच त्यांना गोळ्या घालव्यात ज्याने करून इथून पुढे कुणी आपल्या देशकडे डोळा वर करून पाहायची हिंम्मत करणार नाही. पाकधर्जिन अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा बीड जिल्हा शिवसेनेकडून तीव्र जाहीर निषेश व्यक्त करण्यासाठी आम्ही शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून हे निषेश आंदोलन केले आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांना दिली. याप्रसंगी शिवसेना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या समावेत बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती–जमाती सेना, एसटी कामगारसेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे आजी–माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

## जालन्याचं दाम्पत्य...

काश्मिर येथे सुरक्षित असणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील पर्यटकांची यादी मिळाली आहे. २३ एप्रिल २०२५ दुपारी २ वाजेपर्यंत मिळालेली ही माहिती आहे. अनुष्का मोने (३५ वर्षे), ऋचा मोने (१८ वर्षे), मोनिका जोशी (४५ वर्षे), ध्रुव जोशी (१६ वर्षे), कविता लेले (४६ वर्षे), हर्षल लेले (२० वर्षे), भुषण अशोक गोळे (३९ वर्षे), ज्योती अशोक गोळे (३६ वर्षे), आरव भुषण गोळे (८ वर्षे), विनोद विश्वास गोळे (४१ वर्षे), माधुरी विनोद गोळे (४१ वर्षे), विहान विनोद गोळे (११ वर्षे), स्वाती विश्वास गोळे (३६ वर्षे), अतुल प्रकाश सोनवणे (४२ वर्षे), प्रियंका अतुल सोनवणे (३४ वर्षे), अनन्या अतुल सोनवणे (१२ वर्षे), अर्णव अतुल सोनवणे (८ वर्षे), नंदकुमार म्हात्रे (६५ वर्षे), निलिमा म्हात्रे (६५ वर्षे), निशांक म्हात्रे (३१ वर्षे), प्रमदा पाटील (३० वर्षे), सुजन पाटील (६३ वर्षे), आशा पाटील (६० वर्षे), नेहा ठाकूर (३५ वर्षे), मनोज ठाकूर (३९ वर्षे), विहान ठाकुर (०७ वर्षे), संजय म्हात्रे (५८ वर्षे), स्वाती म्हात्रे (४९ वर्षे), नेत्रा भूषण पांगेरकर (३७ वर्षे), भूषण इंद्रनाथ पांगेरकर (४० वर्षे), इंद्रायणी इंद्रनाथ पांगेरकर (६५ वर्षे), श्लोक भूषण पांगेरकर (१२ वर्षे), विहान देवेन ढोलम (०५ वर्षे), गौरव सांगळे (३७ वर्षे), दिपाली सांगळे (३५ वर्षे), स्वाती सांगळे (४० वर्षे), वेद सांगळे (०७ वर्षे), शुभ क्षीरसागर (१० वर्षे), मनाली प्रणय ठाकूर (२८ वर्षे), प्रणय ठाकूर (२९ वर्षे). या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांना आवाहन केले आहे की, पहलगाम येथे आपल्या जिल्ह्यातील कोणी व्यक्ती असल्यास किंवा आपल्या ओळखीतील कोणी नातेवाईक किंवा व्यक्ती असल्यास त्याची माहिती तत्काळ ९३७२३३८८२७ आणि ७३०४६७३१०५ या क्रमांकांवर जिल्हा प्रशासनास कळवावी.

त्याचप्रमाणे श्रीनगरमध्ये पर्यटकांसाठी चोवीस तास मदत कक्ष सुरू करण्यात आला असून जिल्हा मुख्यालयात जिल्हाधिकारी कार्यालयात २४ तास कार्यरत असलेला आपत्कालीन नियंत्रण कक्ष आणि मदत डेस्क स्थापित करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून पर्यटकांना कोणत्याही वेळी मदत मिळू शकेल. त्यांना काही अडचण आल्यास किंवा आपत्कालीन परिस्थितीत ते खालील क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

दूरध्वनी क्रमांक: ०१९४–२४८३६५१, ०१९४–२४५७५४३, व्हॉट्सप क्रमांक: ७७८०८०५१४४, ७७८०९३८३९७ अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

## अखिल भारतीय....

मराठवाडा उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी यांच्या सूचनेवरून बीड जिल्हाध्यक्ष अशोक होळकर यांनी ही निवड केली आहे .

पत्रकारांच्या प्रश्नावर आवाज उठवणारी ही अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना देशभर कार्यरत असून दिवसेंदिवस या संघटनेची व्याप्ती वाढत असून बीड जिल्ह्यात देखील या संघटनेच्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष अशोक होळकर हे पत्रकारांच्या प्रश्नावर आवाज उठवत आहेत ,संघटनेची मजबूत बांधणी करण्यास सुरुवात झाली असून नुकतीच जिल्हा कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे यांच्यावर देण्यात आली असून वरिष्ठांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष अशोक होळकर व मराठवाडा उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या .

## मराठी पत्रकार...

शेगाव येथील पदाधिकारी राजेश चौधरी,धनराज ससाने,नंदू कुलकर्णी,अनिल उंबरकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून परिषदेची शेगाव टीम सज्ज असून तन–मन–धनाने सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यावर मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी बुलढाणा जिल्हा सक्षम असून बुलढाणा जिल्हा या अधिवेशनाची सर्व ताकदीनिशी जबाबदारी उचलणार असल्याची ग्वाही देत अधिवेशन यशस्वी करण्याचा मानस व्यक्त केला. परीषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे यांनी अधिवेशनाला ज्या ज्या अडचण येतील त्या त्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे उपस्थितांना आश्वासित केले. परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे तसेच डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्याकडे या अधिवेशना संदर्भात वेळोवेळी आढावा घेण्याचे आदेश यावेळी मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांनी दिले. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंह राजपूत यांनी जिल्ह्यातील तेराही तालुक्यात परिषदेच्या शाखांचे गठन झाले असून तेराही शाखेचे पदाधिकारी वेगवेगळ्या समितीच्या माध्यमातून अधिवेशनात सहभागी होतील अशी माहिती दिली. प्रारंभी मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर,सौ शोभना देशमुख, प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे या पदाधिकाऱ्यांचा शेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदू कुलकर्णी,उपाध्यक्ष संजय त्रिवेदी, कार्याध्यक्ष राजकुमार व्यास,कोषाध्यक्ष मंगेश ढोले, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नारायण दाभाडे,राजवर्धन शेगावकर,शेगाव तालुका उपाध्यक्ष इस्माईल,गजानन ददगाळ आदींनी सत्कार केला. युवा क्रांती न्यूज चे संपादक विजय यादव यांनी परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या सह मान्यवरांचा भगवे दुपट्टे व श्री संत गजानन महाराजांची प्रतिमा भेट देऊन त्यांचा सन्मान केला.

बैठकीला मराठी पत्रकार परिषद शाखा खामगाव तालुका अध्यक्ष महेश देशमुख,शहराध्यक्ष गणेश पांजाडे,संग्रामपूर तालुकाध्यक्ष विवेक राऊत,स्वप्निल देशमुख, ज्ञानेश्वर दांदळे आदीसह घाटाखालील जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. संचलन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी केले. तर आभार शेगाव तालुका पत्रकार संघाचे सचिव नितीन घरडे यांनी मानले.

## तुम्ही घाबरू नका...

त्यांच्याशी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी फोनवर संवाद साधला आहे. यात अजित पवार ठोंबरे यांना माझं ओमर अब्दुल्ला आणि मुरलीधर मोहोळ यांच्याशी बोलणं झालं आहे मी सगळी व्यवस्था करतो तुम्ही घाबरू नका असे सांगताना दिसून येत आहेत.

अजित पवार फोनवर काय म्हणाले?

जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये हल्ला झाला आहे, यामध्ये राज्यातील एकूण सहा जणांचा मृत्यू झाला आहे. या दरम्यान रूपाली ठोंबरे देखील जम्मू काश्मीरमध्ये आहेत. ठोंबरे यांच्याकडून व्हिडिओ जारी करत येथे अडकलेल्या पर्यटकांसाठी सोय करण्याचे आवाहन केले आहे. अशातच अजितदादांनी ठोंबर यांच्याशी संपर्क साधला आहे. यावेळी पवारांनी माझं ओमर अब्दुल्ला आणि मुरलीधर मोहोळ यांच्याशी बोलणं झालं आहे. मी सगळी व्यवस्था करतो तुम्ही घाबरू नका असा धीर दिला आहे. आपले बरेच पर्यटक तिथे अडकले आहेत. त्या सर्वांना सुखरूप परत आणण्यासाठी अतिरिक्त विमान सोडण्यासाठी हालचाली सुरू आहेत. काही विमानं आम्ही हैदराबादला नेतोय असे म्हणत अमित शाह तिथे जाऊन बसले आहे. तसेच मोदी साहेब काल रात्री आले आहेत. एकूण परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात आली आहे. पण जे घडलंय ते घडलंय. परंतु, तुम्हाला सर्वांना सुरक्षितपणे घरी आणलं जाईल असे सांगत मुख्यमंत्र्यांसह आम्ही सर्व जण संपर्कात आहोत.

प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणे, हीच प्राथमिकता असल्याचे सांगत, अडकून पडलेल्या पर्यटकांशी समन्वय साधण्यासह त्यांना आवश्यक मदतीसाठी मंत्रालयातील आपत्ती निवारण कक्षात विशेष अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. काश्मिरमध्ये अडकलेल्या पर्यटकांच्या नातवाईकांनी घाबरुन जावू नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये अडकून पडलेल्या पर्यटकांना सुखरूप परत आणण्यासाठी केंद्र सरकार व जम्मू–काश्मीर प्रशासनाच्या यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक ती सर्व मदत मिळावी, यासाठी उपमुख्यमंत्री पवार यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तसेच, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशीही त्यांनी संपर्क साधून विशेष विमानसेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन सुरू केले आहे. शक्य तितकी अधिक विमाने पाठवून पर्यटकांची जलद व सुरक्षित परतीची व्यवस्था करण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेवर उपमुख्यमंत्री अजित पवार स्वतः लक्ष ठेवून असून, राज्य व केंद्र सरकारी संबंधित यंत्रणांशी ते सातत्याने संपर्कात आहेत. राज्य शासनाने जिल्हा प्रशासन, पर्यटन विभाग आणि आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणांना सतर्कतेवर ठेवले असून, परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांशी सुध्दा उपमुख्यमंत्री पवार यांनी दूरध्वनीवरुन संपर्क साधून त्यांना मदतीसह धीर दिला आहे. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांचे मृतदेह तातडीने राज्यात आणण्यासह जखमींना आवश्यक उपचार मिळावेत, तसेच पर्यटनस्थळी हॉटेलमध्ये अडकून पडलेल्या राज्यातील नागरीकांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी सुध्दा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित यंत्रणांना सूचना दिल्या आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मेंढपाळांच्या थेट बँक खात्यात जमा: पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची माहिती

### चराई अनुदानाचा मेंढपाळ कुटुंबाना मोठ्या प्रमाणामध्ये फायदा

**मुंबई । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या वतीने राज्यातील भटक्या जमाती (भज-क) प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील ३०५४ मेंढपाळांना सन २०२४-२५ या वर्षासाठी चराई अनुदानापोटी ७.३३ कोटी अनुदानाचे थेट हस्तांतरण (डीबीटी)द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. मेंढ्यांच्या चराईकरिता राज्यातील मेंढपाळांना अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यामुळे मेंढपाळांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत्र निर्माण झाला आहे आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागला असल्याची भावना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.



महाराष्ट्र राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा पूर्णपणे स्थलांतरित पद्धतीने केला जातो. पावसाळी हंगामामध्ये मेंढपाळ त्यांच्या मूळ गावी परत आल्यानंतर पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांना चराईकरिता क्षेत्र उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चाऱ्याअभावी मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन त्यांची उत्पादकता कमी होऊन मेंढपाळ कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे राज्यामधील मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांसाठी चाऱ्याची कमतरता भरून काढण्यासाठी चराई अनुदान देण्याची योजना पशुसंवर्धन विभाग व इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग यांच्यामार्फत राबविली जात असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

राज्यामध्ये या योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले असून लॉटरी पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे त्यांची निवड यादी तयार करण्यात आलेली होती. जिल्हा व तालुकानिहाय धनगर व तत्सम मेंढपाळांची संख्या विचारात घेऊन जिल्हा व तालुकानिहाय लक्षांक देण्यात आले होते. त्यामधून पात्र मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रति माह ६ हजार रुपये असे एकूण २४ हजार रुपये चराई अनुदान देण्यात आले, असल्याची माहिती पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शितलकुमार मुकणे यांनी दिली आहे.

चराई अनुदान मिळाल्यामुळे मेंढपाळ कुटुंबाना त्यांच्या मेंढ्याकरिता चारा उपलब्ध झाल्याने मेंढ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा होऊन मेंढपाळाच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडत आहे. या योजनेद्वारे राज्यामधील ३०५४ लाभार्थींना रु. ७.३३ कोटी अनुदान थेट लाभधारक हस्तांतरण (DBT) द्वारे लाभार्थींच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे. याबाबत पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ रामास्वामी एन. यांनी पाठपुरावा केला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ‘आपलं मंत्रालय’ गृहपत्रिकेचे प्रकाशन

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या ‘आपलं मंत्रालय’ या गृहपत्रिकेच्या अंकाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मंत्रालयात बैठकीत हा प्रकाशन समारंभ झाला.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव (मावज) समृद्धी अनगोळकर, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव (मावज) अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल, डॉ.गणेश मुळे आदी मान्यवर



उपस्थित होते.

आपलं मंत्रालय’ गृहपत्रिकेच्या अंकामध्ये मंत्रालयातील विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांच्या कथा, कविता, स्वानुभव तसेच पाककला, भ्रमंती या विषयीचे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत.

हा अंक https://online.publuu.com/855586/1875618/page/10 व https://acrobat.adobe.com/id/urn:aaid:sc:-P:e5191597-43f9-409c-b53e-36c54d8b58c7 या लिंकच्या माध्यमातून ऑनलाईन वाचनासाठी मोफत उपलब्ध आहे.

## पुस्तके ज्ञानाने भरलेली असतात, ती तुम्हाला जीवनाचे धडे देतात. प्रा. सुधीर माने

**चौसाळा । प्रतिनिधी**

जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिल रोजी साजरा करण्यात येतो. या दिवसाचे उद्दिष्ट वाचनाची सवय वाढवणे आणि पुस्तकाचे महत्व समजावुन सांगणे हा आहे, कारण पुस्तके ज्ञानाने भरलेली असतात, ती तुम्हाला जीवनाचे धडे देतात असे प्रतिपादन प्रा. सुधीर माने यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे ग्रंथालय विभागातर्फे जागतिक पुस्तक दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्या प्रसंगी ते बोलत होते पुढे बोलताना प्रा. सुधीर माने म्हणाले की, पुस्तके हजारो वर्षापासून अस्तित्वात आहेत आणि त्यात आपल्या भूतकाळाचे , संस्कृतीचे ज्ञान आहे. तुम्ही जितके जास्त वाचाल तितक्या जास्त गोष्टी तुम्हाला कळतील. आपण एक लक्षात ठेऊया की, एक पुस्तक, एक पेन,एक मुल आणि एक शिक्षक जग बदलू शकतात. यावेळी त्यांनी अनेक पुस्तकांचे संदर्भ दिले. अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. विलास भिलारे म्हणाले की, पुस्तके तुम्हाला कष्ट , प्रेम, भीती आणि जीवनाचा एक भाग असलेल्या प्रत्येक गोष्टी शिकवतात. या प्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. गणपती ढवळशंख , पदुत्तर संचालक डॉ. सुधाकर वणवे, संशोधन विभागाचे संचालक डॉ.

प्रशांत साबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक डॉ. पंढरीनाथ हिरवे यांनी केले. तर आभार डॉ. प्रशांत साबळे यांनी व्यक्त केले . या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संखेने उपस्थित होते.

## महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका कायदेशीर तरतुदीनुसारच : भारत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकानंतर मतदार यादी व मतदानप्रक्रियेवर करण्यात येत असलेल्या आरोपांना भारत निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. आयोगाच्या स्पष्टीकरणानुसार, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची त्रुटी नसून, सर्व कायदेशीर तरतुदींनुसारच निवडणुका पार पडल्या आहेत.

आयोगाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात ६ कोटी ४० लाख ८७ हजार ५८८ मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत दर तासाला सरासरी ५८ लाख मतदारांनी मतदान केले. तथापि, शेवटच्या दोन तासांत अपेक्षित ११६ लाखांच्या तुलनेत केवळ ६५ लाख मतदारांनी मतदान केले, हे लक्षवेधी असले तरी त्यावरून कोणत्याही गैरप्रकाराचा निष्कर्ष काढता येत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले.

प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवार व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान प्रक्रिया पार पडली. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांकडून मतदानानंतर कोणतीही तक्रार अधिकृतपणे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निरीक्षकांकडे नोंदवण्यात आलेली नाही.

मतदार यादी संदर्भात आयोगाने सांगितले की, १९५० च्या लोकप्रतिनिधी अधिनियम व १९६० च्या मतदार नोंदणी नियमांनुसार तयार केली जाते. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दरवर्षी राबवला जातो आणि अंतिम यादी सर्व पक्षांना उपलब्ध यादी करून दिली जाते. याशिवाय, अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ ९० अपीले करण्यात आली, जी एकूण मतदार संख्येच्या तुलनेत अत्यल्प आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसकडूनही कोणतीही मोठी तक्रार नोंदवलेली नाही.

मतदान प्रक्रियेत १ लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर ९७,३२५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व सर्व पक्षांकडून १,०३,७२७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमले गेले होते.

## आदित्य शिक्षण संस्थेत राबवली जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम

**बीड । प्रतिनिधी**

अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस .ई. बी. सी. (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचे वतीने महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून 'समता पंधरवडा' या विशेष मोहिमेचे आयोजन बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत करण्यात आले होते. 'समता पंधरवडा' कालावधी १ ते १४ एप्रिल दरम्यान राबवण्यात आला. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना



जात वैधता प्रमाणपत्र मिळणे साठी विशेष मोहिम राबवण्यात आली. आदित्य शिक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमाला संगणक विभाग प्रमुख प्रा. सलीम शेख, कार्यालयीन अधीक्षक जात पडताळणी कार्यालय बीडचे गणेश शेजाळ, प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे, समतादूत बार्टीचे ज्ञानोबा गुजर, सहाय्यक जातपडताळणी कार्यालय बीडच्या साधना मस्के यांची उपस्थिती होती. यावेळी गणेश शेजाळ यांनी महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या योजना जसे की स्वाधार योजना,पंडीत दीनदयाल स्वयम् योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाला डिजिटल पंख

### ▸प्रत्येक विद्यार्थी गिरवणार डिजिटल गुणवत्तेचे धडे

**रायगड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ करण्यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मा.भरत बास्टेवाड(भाप्रसे) यांच्या संकल्पनेतून साकारलेले व विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी मा.नेहा भोसले(भाप्रसे) यांच्या प्रेरणेतून व पुनिता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रस्नेही शिक्षकांच्या सहाय्याने राजिप शिक्षण प्राथमिक नावाचे



डिजिटल शिक्षणाची नवी दिशा डिजिटल प्रगतीचे एक पाऊल, रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्राथमिक आता एका क्लिकवर या प्रमाणे व NEP-२०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार पायाभूत स्तर,पूर्वतयारी स्तर, पूर्व माध्यमिक स्तर रचनेनुसार अध्ययन अध्यापन ,खेळ कृती,सहशालेय उपक्रम, स्पर्धा परीक्षा, माझा अभ्यास, तंत्रशिक्षण असे मुख्य पेज असुम पुढे विषय व अध्ययन निष्पत्तीनिहाय दैनंदिन पाठ योजना सहायक उपक्रमाची यात रचना असेल.या app च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे ग्रेडिंग अचूक व थेट करणे सुलभ जाईल. सोबतच विविध सोशल मीडिया च्या जोडण्या सुरक्षा मर्यादेत राहून देण्यात आलेल्या आहेत.

या शैक्षणिक अँप लोकार्पण चे दि.२१ एप्रिल,२०२५ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले,अति मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी राहुल कदम, पुनिता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या उपस्थितीत करण्यात आले.यावेळी या अँप च्या निर्मितीत व ई साहित्य तयार करण्यात मदत करणारे शिक्षक उपस्थित होते.या उपक्रमासाठी नोडल अधिकारी म्हणून श्री.सुभाष राठोड यांची नियुक्ती करण्यात आली होती.

**हे शैक्षणिक डिजिटल प्लॅटफॉर्म असून यामुळे विद्यार्थी व शिक्षकांना दैनंदिन अध्ययन अध्यापन करणे सुलभ होणार आहे.व्हिडिओ, ppt, कृतीपत्रिक,क्विज,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन असे कार्य या अँप च्या माध्यमातून सुलभ होईल असा विश्वास आहे.- पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी प्राथमिक रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

## महत्वाचे

### प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या इशिता आणि याश्वीला छत्रपती पुरस्कार



**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या इशिता रेवाळेला जिम्नॅस्टिक्स क्रिडा प्रकारात आणि याश्वी शाहला आर्टिस्टिक रोलर स्केटिंग या क्रिडा प्रकारात महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च क्रिडा पुरस्कार माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते पुण्यातील बालेवाडी क्रिडा संकुलात प्रदान करण्यात आला. प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन राणे, जिम्नॅस्टिक्स विभाग प्रमुख निलम बाबरदेसाई, प्रशिक्षक विशाल कटकदौंड आणि आर्टिस्टिक रोलर स्केटिंग प्रशिक्षक आदेश सिंह यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### अनिल भंडारी यांना पितृशोक, मिलापचंद भंडारी यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सारडा संकुल येथील रहिवासी सेवानिवृत्त कंडक्टर मिलापचंद पारसमल भंडारी यांचे बुधवारी २३ एप्रिल रोजी दुपारी ३:२० वाजता संथारा व्रताने निधन झाले. दुपारी बारा वाजेदरम्यान त्यांना प्रत्याख्यान देण्यात आले होते. मृत्यूसमयी त्यांचे वय ८३ वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर येथील अमरधाम स्मशानभूमीत गुरुवारी दि.२४ एप्रिल रोजी सकाळी ८:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पक्षात दोन मुले, तीन मुली, सुना नातवंडे, चार भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे. लोकमतचे उपसंपादक अनिल भंडारी, व्यापारी अभय भंडारी यांचे ते वडील होत.

### पुणे येथे दि. २६ एप्रिल रोजी कैकाडी समाजाचा वधु-वर परिचय मेळावा



**बीड । प्रतिनिधी**

कौकाडी समाज वधु वर सूचक मंडळ पुणे यांच्यावतीने कैकाडी समाजातील वधु-वर परिचय मेळावा पुणे येथे दि.२६ एप्रील रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास कैकाडी समाजातील उप वधु-वर व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.रमेश कैवाडे यांनी केले आहे. प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दि. २६ एप्रील २०२५ रोजी स्थळ अल्प बचत भवन विधान भवनाच्या पाठीमागे पुणे रेल्वे स्टेशन जवळ येथे कैकाडी समाजातील वधु-वरांचा परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्व स्तरातील लोकांचे विवाह इच्छुक मुला-मुलीना जोडीदार शोधण्यासाठी मदत्त करीत असतात. हा मेळावा समाजातील सर्व स्तरातील शिक्षण, उच्च शिक्षण, गरीब, श्रीमंत, घटस्फोटीत, विधवा आणि वधु-वरांसाठी खुला आहे. तरी सर्वांनी या मेळाव्यासाठी जास्तीत जास्त वधु-वरांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे अवाहन केले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६८५/२०२५**

**सखुबाई वि, निरंक**

ज्याअर्थी मनोहर विश्वनाथ भांबे, हे दिनांक २२.०५.२०२३ रोजी लोळदगांव ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी,

१. सखुबाई भ्र. मनोहर भांबे, वय ६५ वर्षे, धंदा- घरकाम रा. लोळदगांव, ता. जि. बीड, २. दत्तात्रेय पि. मनोहर भांबे, वय- ४६ वर्षे, धंदा- शेती रा. लोळदगांव, ता. जि. बीड, ३. सदीप पि. मनोहर भांबे, वय- ४४ वर्षे, धंदा- शेती रा. लोळदगांव, ता. जि. बीड, ४. अश्वीनी भ्र. कांताराम परजने, वय- ४८ वर्षे, धंदा- घरकाम रा. खालापुरी, ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले आहेत तर अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदन्हु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ११/०६/२०२५ ही आहे.

आज दिनांक २३/०४/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(ॲड. डी. एस. जाधव यांचे मार्फत)

आदेशावरून.

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक अधीक्षक

दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

CMYK

दैनिक मराठवाडा पत्र

● epaper.marathwadapatra.com

गुरूवार, दि.२४ एप्रील २०२५



## तहसीलदार तसेच नगरपरिषद क्षेत्रासाठी आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप

**बीड ।** प्रतिनिधी

मान्सून कालावधीमध्ये बीड जिल्हयातील अनेक गावांना दरवर्षी मोठया प्रमाणत नैसर्गिक आपत्तीचा धोका संभवतो. अचानक नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास मदत कार्यात मोठा अडथळा निर्माण होतो अपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून प्रत्येक गावामध्ये मतदकार्य शक्य व्हावे यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने जिल्हयातील सर्व तहसीलदार तसेच नागरपरिषद क्षेत्रासाठी आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप केले असल्याचे जिल्हा अपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण बीड यांनी कळविले आहे. बीड जिल्हयात एकूण ६३ पुरप्रवण गावे आहेत या गावांना मान्सुन कालावधीमध्ये विविध नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तेथे आपत्ती व्यवस्थापन ▶▶ उर्वरित पान २ वर



# तहानलेल्या वन्यजीवांसाठी बनवला चार हजार लिटरचा पानवठा

**कडा ।** प्रतिनिधी

आष्टी तालुक्याला गर्भगिरी पर्वत लाभल्याने या पर्वतात अनेक वन्यजीव राहतात उन्हाळ्यात पाण्याचे नैसर्गिक स्रोत नद्या,ओढे आटल्याने वन्यजीवांचे पाण्यासाठी हाल होतात. तर पाण्याअभावी अनेक प्रजाती नष्ट होत आहेत,पाण्याच्या शोधात वन्यजीव मानवी वस्तीत येतात बरेचदा रस्त्यावर अपघात तर काहीचा विहिरीत पडून मृत्यू होतो.कडा पिंपरखेड रस्ता येथील आडाचे माळरान डोंगर परिसरात शेतातील काही ठिकाणी झाडांना ठिबक पाईप केले आहेत या डोंगर परिसरातील तहानलेले पशुपक्षी ठिबक पाईपातील थेंबे चाटून तहान भागवताना दिसत होते या पाईपात कधी पाणी असते तर कधी नसते या ठिकाणी जीवदया फाउंडेशन टिमने जाऊन पाहाणी केल्यावर पशुपक्ष्यांचे पाण्यासाठी होणारे हाल पाहून येथील माळरानावर सिमेंट कॉँक्रीटचा चार हजार लिटर क्षमतेचा पानवठा तयार करण्यात आला. त्यामुळे येथील वन्यजीवांसाठी पाण्याची सोय झाली आहे,यासाठी कडा येथील जीवदया फाउंडेशन टीम चे प्राणीमित्र नितीन आळकुटे, शेलैश मिश्रा,अक्षय भंडारी, गणेश पवळ,मोरे, आदींनी निष्कामपणे आपले योगदान देत पानवठा बनवला, वन्यजीवांसाठी तयार झालेल्या नवीन पानवठ्यात पिंटु भाऊ पटवा यांच्या हस्ते टँकरने पाणी सोडले त्यांनी एक घास एक घोट वन्यजीवांसाठी या उपक्रमात सहभाग घेऊन मदत केली.

तहानलेल्या वन्यजीवांसाठी पाणी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असते. एक घोट एक घास वन्यजीवांसाठी हा उपक्रम आठ वर्षापासून सुरू केला आहे या उपक्रमाला मित्र व ▶▶ उर्वरित पान २ वर

## जवळबन सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक बिनविरोध

**केज ।** प्रतिनिधी

तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक गावकऱ्यांच्या समन्वयातून बिनविरोध करण्यात आली. पार्टी पक्ष संघटना वारंवार संघर्ष उभा राहतो. यावेळी गावकऱ्यांनी एकत्र येत योग्य उमेदवारांची निवड करून सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक बिनविरोध झाली. याबद्दल सर्व सदस्यांचे अभिनंदन केले जातात. दीड वर्षांपूर्वी मुदत संपलेली सोसायटीची निवडणूकिवर बहिष्कार टाकल्यामुळे प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली होती. एक एप्रिल रोजी रोजी सुरू झालेल्या निवडणूक प्रक्रियेचा उमेदवारी माघार मुदत २३ एप्रिल रोजी झाली. निवडणूक निर्णय अधिकारी मालती वहावळे यांनी बिनविरोध सदस्य यांचे निकालपत्र दिले. भाकरे नितीन अर्जुन, करपे प्रवीण चंद्रकांत ,करपे दिगंबर बबन, करपे शिरू ज्ञानोबा, गायकवाड कैलास महादेव, गायकवाड दशरथ शहाजी, करपे अर्जुन हरिभाऊ, भाकरे बालासाहेब पांडुरंग, करपे शोभा अशोक, पारेकर करुणाबाई शिवाजीराव, जोगदंड एकनाथ चंदाआप्पा, घाडगे गोवर्धन वैजनाथ ,करपे गणेश विठ्ठलराव हे उमेदवार बिनविरोध निवडून आले.



## जायकवाडीच्या पाण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर टाळ-मृदंग मोर्चा

**● लोकलढा आंदोलनच्या मादळमोही बैठकीत निर्धार**

**बीड ।** प्रतिनिधी

शेती पिकांसाठी पाण्यावाचून हालहाल झालेल्या बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागाल जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्प व मराठवाडा वॉटर ग्रीड योजना गतीने राबवावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर लोकलढा आंदोलनाच्या वतीने टाळ-मृदंग मोर्चा काढण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला. लोकलढा आंदोलनातील शेतकऱ्यांची मादळमोही (ता. गेवराई) येथे झालेल्या बैठकीत हा निर्धार करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर



## शुक्रवारी बीडमध्ये मोफत तपासणी शिबिर महिलांसाठी तज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती

**बीड ।** प्रतिनिधी



मुळव्याधाच्या रुग्णांसाठी मूळव्याध तज्ज्ञ डॉ. अमोल खेत्रे यांनी बीडमध्ये मोफत मूळव्याध तपासणी शिबिराचे आयोजन शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी केले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांची टिम पूर्णपणे मोफत तपासणी करणार आहे. विशेष म्हणजे महिलांच्या तपासणीसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे.

हे शिबीर बीड शहरातील जालना रोड येथील सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल येथे होणार आहे. शिबिरातील रुग्णांना औषध उपचारातही सुट देण्यात येणार आहे. मुळव्याध-भगंदर-फिशरचे लक्षणे आढळून आल्यास तत्काळ डॉक्टरांकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. तपासणी न केल्यामुळे मूळव्याध हा आजार वाढतच जातो. आणि त्याचे दुष्परिणाम भविष्यात रुग्णांना सहन करावे लागतात. सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल बीडच्या वतीने मुळव्याध-भगंदर-फिशरची मोफत तपासणी शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. बीड शहरातील जालना रोड येथील डी.सी. लोढा कॉम्लेक्स, मंत्री बँकेच्या शेजारी असलेल्या सुश्रुत मूळव्याध हॉस्पिटल येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मुळव्याध-भगंदर-फिशर याचे लक्षणे मलप्रवृत्तीच्या वेळेस किंवा नंतर रक्त पडणे, शौच्याच्या जागेवर आजुबाजुला गाठ येणे, त्यामधून चिकट स्त्रव व रक्त येणे, शौचाच्या जागी आग होणे, वेदना होणे, टोचल्यासारखे वाटणे, शौचाच्या वेळेस मांसल गोल आकाराचा भाग बाहेर येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याची तत्काळ तपासणी करुन त्यावर निदान करता येते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा आजार बळावतो. त्यासाठी तपासणी करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. या हॉस्पिटलमध्ये गुदगत आजारांसाठी क्षारसुत्र, क्षारकर्म, आग्रिकर्म सुरक्षित आयुर्वेदिक उपचार पध्दती उपलब्ध आहेत. या शिबिरामध्ये फोनवरही नाव नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

## ॲड.बालाप्रसाद सारडा यांची लवाद अधिकारी म्हणून लवाद नामतालिकेवर निवड

**बीड ।** प्रतिनिधी



बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील विधीज्ञ ॲड.बालासाहेब सारडा यांची सहकार आयुक्त कार्यालय पुणे यांनी २०२५-२८ या वर्षाकरिता दुसर्या वेळेस लवाद अधिकारी म्हणून निवड केली आहे.

ॲड.बालाप्रसाद द्वारकादास सारडा हे मागील १४ वर्षांपासून बीड जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये वकीली व्यवसाया करीत आहेत त्यांना शिक्षणात आवड असल्यामुळे त्यांनी बी.कॉम. एल.एल.बी., पत्रकारिता व एम.बी.ए. या वेगवेगळ्या क्षेत्रातील पदवी संपादन केलेल्या आहेत त्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण हे मराठी माध्यमातून झालेले आहे. त्यांनी वकीली व्यवसाय करीत असतांना ग्राहक आयोग, धर्मादाय आयुक्त कार्यालय बीड यांच्याकडील प्रकरणात पक्षकारांना योग्य तो न्याय मिळवून दिलेला आहे तसेच जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये केसेस जिंकल्या आहेत.

यापुर्वी त्यांना अवसायक व लवाद अधिकारीचे पॅनलवर नियुक्ती मिळालेली आहे त्यानंतर त्यांची दुसर्यांदा सहकार आयुक्त पुणे यांनी लवाद नामतालिकेत लवाद अधिकारी म्हणून निवड केलेली ▶▶ उर्वरित पान २ वर

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये प्रभावी प्रोफाइल विषयावर ऑनलाईन कार्यशाळा संपन्न

**किल्ले धारूर ।** प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रभावी प्रोफाइल या विषयावर श्री बालाजी युनिव्हर्सिटी पुणे येथील स्कूल ऑफ कॉम्पुटर स्टडीज येथील डॉ. आसाराम जानवळे यांनी विद्यार्थ्यांना स्वतः चे (डळपज्ञशवळप झीषळश्रश चरज्ञळपस) प्रभावी प्रोफाइल कशी तयार करावी ती अद्ययावत कशी ठेवावी यासंबंधी सूत्रबद्ध मार्गदर्शन केले. लिंकीड संबंधीची प्रक्रिया समजावून देताना विविध उदाहरणे सांगितली. ऑनलाइन माध्यमातून आपण सजग व जागृत राहणे गरजेचे आहे. आपला बायोडाटा अर्थात सीव्ही अद्ययावत नियमितपणे करणे अपेक्षित आहे. आपणास हव्या असलेल्या नोकरीच्या संधी व ठिकाणे व्यवस्थितरित्या दर्शविल्यास त्यासंबंधीचे कॉल लेटर्स आपणास प्राप्त होतात. अर्थातच नोकरीच्या विविध संधींची मोठ्या प्रमाणावर उपलब्धता विद्यार्थ्यांना होते. यामुळे ▶▶ उर्वरित पान २ वर




# सनगावमधील वकील तरुणीस मारहाणीप्रकरणी आरोपी अजूनही मोकाट!

**तात्काळ आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर संबळ आंदोलन करणार : वर्षाताई जगदाळे**

**बीड ।** प्रतिनिधी

आंबाजोगाई तालुक्यातील सनगाव येथे घडलेल्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. गावातील वकील ज्ञानेश्वरी अंजान यांना गावातील सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. या प्रकरणी युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात १० आरोपींविरोधात विविध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले असूनही, अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.मारहाणीमुळे गंभीर जखमी झालेल्या ज्ञानेश्वरी अंजान यांच्यावर सध्या बीड येथे उपचार सुरू असून, त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाला देखील जीवितास धोका निर्माण झाल्याची शक्यता आहे.या संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन जिल्हा पोलीस अधिक्षकांना देण्यात आले असून, तात्काळ आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर संबळ आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मनसेचे महिला राज्य उपाध्यक्षा वर्षा जगदाळे ,उपजिल्हाप्रमुख सदाशिव बिडवे, शहराध्यक्ष अमरजान पठाण, महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे यांनी पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.



## प्रलंबित तक्रारीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ ५ मे रोजी १२.00 ते २.00 पर्यंत उपस्थित रहावे

**बीड ।** प्रतिनिधी

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय येथे दि. ५ मे २०२५ रोजी दुपारी १२.०० ते २.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनानिमित्त आयोजन करण्यात आले आहे.

ज्या अर्जदारांना त्यांच्या प्रलंबित कामाच्या तक्रारी मांडावयाच्या आहेत त्यांनी तक्रार अर्ज घेऊन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन नगर रोड बीड, ४३११२२ या ठिकाणी स्वत: उपस्थित रहावे, असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या) चे व्यवस्थापक यांनी केले




CMYK